# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## 'पीएमपीएमएल' कडून रामवाडी मेट्रो स्टेशन ते ईऑन आयटी पार्क खराडी पर्यंत मेट्रो फिडर बस सेवा

पीएमपीएमएल कडून मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मेट्रो स्टेशन पासून इच्छित स्थळी जाणेकरिता रामवाडी मेट्रो स्टेशन ते ईऑन आयटी पार्क, खराडी या मार्गावर मेट्रो फिडर बससेवेचा शुभारंभ आज दि. १९/०६/२०२४ रोजी पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते व महा मेट्रो रेल पुणे चे संचालक मा. श्री. विनोद अग्रवाल यांच्या हस्ते तसेच महा मेट्रो रेल पुणे चे महाव्यवस्थापक मा. डॉ. राजेंद्र सनेर-पाटील, पीएमपीएमएल चे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर मा. श्री. सतिश गव्हाणे व महा मेट्रो रेल पुणे चे जनसंपर्क अधिकारी मा. डॉ. हेमंत सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बसला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यापसंगी महा मेट्रो चे डी.जी.एम. श्री. मनोज डॅनियल, पंचशील ग्रुप आयटी पार्क खराडी चे व्हाईस प्रेसिडेंट श्री. विजितसिंग थोपटे, पीएमपीएमएल चे वाहतूक नियोजन व संचलन अधिकारी श्री. नारायण करडे, वाहतूक नियोजन अधिकारी (आयटी) श्री. विजय रांजणे, भेकराईनगर डेपो मॅनेजर श्री. सुरेंद्र दांगट, पुणे स्टेशन डेपो मॅनेजर श्री. संजय कुसाळकर, हडपसर डेपो मॅनेजर श्री. दिपक वाळुंजकर, वाघोली डेपो मॅनेजर श्री. सोमनाथ वाघोले यांच्यासह ईऑन आयटी पार्क खराडी येथील विविध कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

---

**"पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात येत असलेल्या या फीडर बससेवेमुळे प्रवाशी नागरिकांना रामवाडी मेट्रो स्टेशन पर्यंत पोहोचणे सोयीचे होणार आहे. या बसमार्गावर पर्यावरणपूरक स्मार्ट एसी ईलेक्ट्रिक बसेस संचलनात असणार आहेत. तरी प्रदूषण व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जास्तीत जास्त प्रवाशांनी या बससेवेचा वापर करावा."**

**---- मा. डॉ. संजय कोलते, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

---

**पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात आलेल्या फिडर बससेवेचा तपशील खालीलप्रमाणे**

| मार्ग क्रमांक | पासून-पर्यंत | मार्गे | पहिली बस | शेवटची बस | वारंवारिता | फेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| मेट्रो शटल २० | रामवाडी मेट्रो स्टेशन ते ईऑन आयटी पार्क (खराडी) | वडगाव शेरी फाटा, विमाननगर कॉर्नर, चंदननगर, खराडी बायपास, जनकबाबा दर्गा, टाऊन डाऊन चौक खराडी, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र.३ व ५, ईऑन गेट नंबर २ (खराडी) | सकाळी ०७.३० वा. | रात्रौ ०९.०० वा. | ३० मिनिटे | २० |
| | ईऑन आयटी पार्क (खराडी) ते रामवाडी मेट्रो स्टेशन | | सकाळी ०८.०० वा. | रात्रौ ०९.३० वा. | ३० मिनिटे | २० |

तरी सदरच्या फीडर बससेवेचा लाभ प्रवाशी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल कडून करण्यात येत आहे.

---

दि. १९/०६/२०२४.

मा. संपादक,
दैनिक .........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.